**पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी ४११ ०१८**
**ब प्रभाग समिती, चिंचवड ४११ ०३३**
**कार्यपत्रिका क्र. ८**
**सभावृत्तांत**

दिनांक :- ७/०१/२०२० वेळ :- दुपारी १२.३० वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या ब प्रभाग समितीची मासिक सभा मंगळवार दिनांक ७/१/२०२० रोजी दुपारी १२.३० वा. ब प्रभाग कार्यालयाचे छत्रपती शिवाजी महाराज सभागृहामध्ये आयोजित करणेत आली होती. प्रस्तुत सभेस खालीलप्रमाणे सन्मा. नगरसदस्य उपस्थित होते.

१. मा.करुणा शेखर चिंचवडे - सभापती
२. मा.बाळासाहेब नामदेव ओव्हाळ - सदस्य
३. मा.संगिता राजेंद्र भोंडवे - सदस्य
४. मा.माधुरी कुलकर्णी उर्फ मोनाताई - सदस्य
५. मा.सचिन बाजीराव चिंचवडे - सदस्य
६. मा.सुरेश शिवाजी भोईर - सदस्य
७. मा.राजेंद्र तानाजी गावडे - सदस्य
८. मा. विनोद जयवंत नढे - सदस्य
९. मा.उषा दिलीप काळे - सदस्य
१०. मा.संतोष अंकुश कोकणे - सदस्य
११. मा.बिभीषण बाबु चौधरी - सदस्य
१२. मा.विठ्ठल बबनराव भोईर - सदस्य

याशिवाय खालील प्रमाणे अधिकारी / कर्मचारी उपस्थित होते.

श्री.प्रशांत पाटील – कार्यकारी अभियंता, स्थापत्य, श्री.के.डी.दरवडे - सहा.आरोग्य अधिकारी, श्री.राजेंद्र जावळे - उपअभियंता, जलनि:सारण, श्री.पारोल के.बी (मुख्य आरोग्य निरीक्षक), श्री. नितीन देशमुख –कार्यकारी अभियंता, विद्युत, श्री.अकबर शेख – उपअभियंता, विद्युत, मा.सी.एन.धानोरकर, श्री.राजेंद्र इंगळे - उपअभियंता स्थापत्य विभाग, श्री.उमेश सदानंद मोने – कनिष्ठ अभियंता, स्थापत्य, श्री.एस.एल.नरोटे – उपअभियंता, स्थापत्य, उद्यान इत्यादी.

सर्वप्रथम मा. सभापती करुणा शेखर चिंचवडे यांनी उपस्थितांचे स्वागत करुन सभेचे कामकाजास सुरुवात केली.

दिनांक ०५/१२/२०१९ रोजीचा सभावृत्तांत क्र.७ कायम करणेत आला.

ठराव क्र. विषय क्र. १
दि. ७ /०१/२०२०
सुचक : मा. अनुमोदक: मा.
संदर्भ :- मा.संगिताताई भोंडवे यांचे दिनांक २३/१२/२०१९ चे पत्र

मा.संगिताताई भोंडवे यांचे दिनांक २३/१२/२०१९ चे पत्रानुसार मौजे रावेत येथील प्रभाग क्र.१६ मधील एस बी पाटील पब्लीक स्कुल समोरील रस्ता, शांताई कॉर्नर पासुन ते शिंदे वस्ती एमआयडीसी रोडला कनेक्ट होणा-या रस्त्याला कै.मधुकर सहादु भोंडवे हे नाव देण्यास मान्यता देणेबाबत विचार करणे.

सदरचा विषय तहकुब ठेवणेत येत आहे.

----------

ठराव क्र. ११ विषय क्र. २
दि. ७ /०१/२०२०
सुचक : मा.संगिता भोंडवे अनुमोदक: मा. सचिन चिंचवडे
संदर्भ :- मा.करुणाताई चिंचवडे यांचे दिनांक ७/०१/२०२० चे पत्र

मा.करुणाताई चिंचवडे यांचे दिनांक ०७/०१/२०२० चे पत्रानुसार ब प्रभाग समिती सदस्यांना स्वच्छ भारत अभियानांतर्गत जयपुर, उदयपुर (राजस्थान) महानगरपालिकेने राबविलेल्या विविध योजना व प्रकल्पांची पाहणी, अभ्यास करुन त्याप्रमाणे पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमध्ये त्यातील चांगल्या योजना व प्रकल्पांची अंमलबजावणी करणेचे दृष्टीने ब क्षेत्रिय समिती सदस्य व महानगरपालिकेचे अधिकारी यांच्याकरीता जयपुर, उदयपुर (राजस्थान) महानगरपालिका येथे पाहणी करणेकामीचे दौ-यास व होणा-या खर्चास मान्यता देणेत येत आहे. तसेच सदर अभ्यासदौ-यासाठी

अंदाजे ६,००,०००/- खर्च अपेक्षित आहे. सदर विषय सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता मा.स्थायी समितीकडे पाठविण्यात यावा.

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

वरील प्रमाणे सभेचे कामकाज झाले मा. करुणा शेखर चिचवडे यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानून सभा संपल्याचे जाहिर केले.

[करुणा शेखर चिंचवडे ]
सभापती
ब प्रभाग समिती, चिंचवड
पिंपरी चिंचव महानगरपालिका,

ब प्रभाग कार्यालय, चिंचवड ३३
जा. क्र. बक्षे/सभाशाखा/२/कावि/२४/२०२०.
दिनांक : १४/०१/२०२०

प्रशासन अधिकारी तथा
सचिव( सभाशाखा )
ब प्रभाग समिती

प्रत -सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी
यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना

पिंपरी चिंचवड महानगरपालिका

ब क्षेत्रिय कार्यालय ,चिंचवड

क्र.बक्षेका/ २ / २५ /२०१९

दिनांक - १४/०१/२०२०

प्रति,

मा.सर्व विभागप्रमुख,
ब क्षेत्रिय कार्यालय,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका

**विषय - मा.ब प्रभाग मासिक सभेमध्ये झालेल्या विषयांवर योग्य ती कार्यवाही करणेबाबत..**

| अ.क्र. | मा.नगरसदस्य | उपस्थितीत केलेले प्रश्न | संबंधित विभाग |
|---|---|---|---|
| १ | मा.माधुरी कुलकर्णी ऊर्फ मोनाताई (प्रभाग क्र.१७-ब) | १) प्रेमलोक पार्क येथील साफसफाई होत नाही तसेच कचरा उचलला जात नाही. | आरोग्य |
| २ | मा.राजेंद्र गावडे मा.सुरेश भोईर (प्रभाग क्र.१८ ड) | १) स्मार्ट सिटी अंतर्गत चालु असलेल्या कामांमुळे रस्त्यांमध्ये केबल अथवा पाईप टाकणेकरीता | स्थापत्य/ आरोग्य |

| | | | |
|---|---|---|---|
| | | करण्यात आलेले खड्डे व राडारोडा तसेच राहतात, यासाठी कामामध्ये Co-ordination ठेवण्यात यावे.<br>२) चिंचवड गावात अनेक ठिकाणी रस्त्यांवर राडारोडा व कच-याचे ढीग आहेत, ते लवकरात लवकर उचलण्यात यावे. | |
| ३ | मा.जयवंत नढे | १) काळेवाडी येथील बीआरटी येथे रोडचे मध्यभागी गाडया लागतात, त्यावर कारवाई करण्यात यावी.<br>२) एम एम शाळेसमोरील चौकात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जीवनावर आधारित समुह शिल्प करणे तसेच सुशोभिकरण करणेबाबत पाच महिन्यापासुन पत्र दिलेले असुनही अद्याप काम झालेले नाही. सदरचे काम लवकरात लवकर होणे अपेक्षित आहे. | अतिक्रमण/ स्थापत्य |
| ४ | मा.सचिन चिंचवडे | १) वाल्हेकरवाडी येथे ३ वर्ष झाले पण डिमार्केशन झाले नाही.<br>२) चिंचवडेनगर ते वाल्हेकर वाडी येथील (२०५ अंतर्गत) नदीच्या कडेने ३० मी.चा रस्ता मंजुर करुन घेतला होता परंतु अद्यापपर्यंत यावर कुठलीही कार्यवाही झालेली नाही.<br>३) दिनांक ३० डिसेंबर रोजी मा.आयुक्त यांचेसमवेत रावेत स्मशानभुमिचे संदर्भात मिटींग झाली, तरी सदर स्मशान भूमिचे काम चालु करण्यात यावे. | स्थापत्य/ नगररचना |

| | | | |
|---|---|---|---|
| ५ | मा. बाळासाहेब ओव्हाळ | १) उत्तमनगर, किवळे , साईनगर, आझाद कॉलनी येथील ड्रेनेज व पाईपलाईनची सर्व कामे लवकरात लवकर करणेत यावी.<br>२) साईनगर व आझाद कॉलनी येथे साफसफाई केली जात नाही, कचरा गोळा केला जात नाही. मंजुर अटीशर्तिनुसार काम होत नसुन सुपरव्हीजन केले जात नाही.<br>३) साई नगर डिपी रोड डिमार्केशन करण्यात यावे, काही भागात डिमार्केशन झाले आहे त्यामुळे नगररचना विभागाने जेवढा रस्ता ताब्यात आहे त्या रस्त्याचे काम सुरु करावे. विकासनगर मुकाई चौक ते शिंदे पेट्रोल पंप रस्ता (विकासनगर मधुन देहु रोड कडे जाणारा रस्ता)<br>४) एलईडी लाईट्सची समस्या सोडवण्यात यावी. | पाणीपुरवठा, ड्रेनेज<br>आरोग्य<br>विद्युत |

प्रशासन अधिकारी तथा
सचिव( सभाशाखा )
ब प्रभाग समिती